# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट :- ४२५/२०२३** **दिनांक - १२/१२/२०२३**

## खुनाचा प्रयत्न करुन एक वर्षापासुन फरार आलेल्या आरोपीतास अटक

## नायगाव पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटिकरण पथकाची कामगरी

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दि. ०७/०८/२०२२ रोजी ००.०५ वा.चे सुमारास गरीब नवाज हॉटेलच्या पुडे, क्रॉगेस पक्षाच्या ऑफिसच्या समोर रस्त्यावर, गौरातपाडा, दर्गा रोड,चिचोंटी, नायगाव पुर्व ता वसई जि पालघर येथे फिर्यादी यांच्या दुकानातुन जेवणासाठी त्यांचे काका शफी अन्वर खान यांच्या घरी जावुन जेवण करुन परत त्यांच्या दुकानावर येत असताना वरील नमुद घटनास्थळावर आलो असता तेथे उपस्थित असल्यापैकी १) अग्रजभाई या इसमान त्यांच्या पाठीमागुन येवुन मागील भांडणाचा राग मनात धरुन फिर्यादीस यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या हातातील कोणत्यातरी धारदार हत्याराने फिर्यादी यांच्या डोक्याच्या डाव्या बाजुस तसेच उजव्या हातावर वार करुन इसको मार डालो,यह उनको साथ का है असे बोलला असता त्यांच्या सोबत असलेले इतर २) सलीम,३) उस्मान राहणार-गौरातपाडा,चिचोंटी.नायगाव पुर्व यांनी फिर्यादीचा छातीवर तसेच संपुर्ण शरीरावर ठोश्याबुक्यांनी मारहाण केल्याने फिर्यादी यांनी अग्रजभाई,सलीम व उस्मान यांच्याविरुध्द वालीव पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याने वालीव पोलीस ठाण्यात सदर तक्रारीवरुन वालीव पो.ठाणे गुन्हा रजि नं ७९०/२०२२ भा.द.वि.स. कलम ३०७,३२३,३४ प्रमाणे दाखल होता. सदर गुन्हयातील आरोपीत नामे सलीम रमजान अन्सारी वय-२४ वर्षे, व मोहम्मद उस्मान कमरुद्दीन शेख वच-२३ वर्षे दोन्ही राहणार -मुन्ना चाळ, गौरातपाडा, चिचोंटी, नायगाव पुर्व यांना दिनांक ०९/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आले होते. परंतु सदर गुन्हयातील मुख्य आरोपीत अग्रजभाई पुर्ण नाव व पत्ता माहित नाही हा गुन्हा केल्यापासुन फरार होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने मा. वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वेगवेगळे पथके बनवुन गुन्हयातील फरार असलेला आरोपीत नामे अग्रजभाई पुर्ण नाव माहित नाही यांचा शोध घेत असताना गुप्तबातमीव्दारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे व तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे सदर आरोपी हा फाऊटन हॉटेल, किनारा घाबा याठिकाणी येत असल्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने गुन्हयातील फरार आरोपीत हा मुंबई-अहमदाबाद नॅशनल हायवे वरती सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले असुन सदर आरोपीत यास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव व पत्ता आकाश रामसरण यादव, वय-२० वर्षे, राहणार- सरस्वती चाळ, क्रांती चौक, भारतमाता स्कुलजवळ, कुरार, कांदिवली पुर्व मुंबई ऊर्फे अग्रजभाई असे सांगितल्याने सदर आरोपीत यांच्याकडे गुन्हयाच्या अनुशंगाने चौकशी करता सदर आरोपीत यांनी गुन्हया केल्याचे निषन्न झाल्याने सदर आरोपीत यास गुन्हयात अटक करण्यात आली आहे

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे,स.पो.नि. गणेश केकान, रोशन देवरे, पो.हवा. देविदास पाटील पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.